**एस.सी.सी.क्र. २२४/२२**
**शासन वि. सोमनाथ**
**निशानी क्रं. ८ लगत**

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी द्वारे–

मी शपथेवर निवेदन करतो/करते की,

माझे नांव – विकास रोहिदास उर्फ सुरेशदास कांबळे

वय – ३० वर्षे, धंदा – मजुरी

राहणार – हिप्परगा–रवा, ता. लोहारा जि. धाराशिव

सरतपास सरकारपक्षातर्फे विशेष सरकारी वकील श्री. बी.बी. ढेकणे यांच्यामार्फत –

१. दिनांक ११–०६–२०२२ रोजी वाठोरे पोलीस उपनिरीक्षक यांनी मला पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. माझी त्यांनी मी गावाकडे जात असताना सही घेतली होती. माझ्या समक्ष काही जप्त केले नाही. आता मला पंचनामा दाखविला त्यावर पंच क्रं.२ म्हणून पंचनाम्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**(साक्षीदार हा सरकारपक्षास पाठबळ देत नसल्याने सरकारी वकीलानी साक्षीदारास पुरावा अधिनियम कलम १५४ प्रमाणे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी दिली.)**

उलटतपास सरकारपक्षातर्फे विशेष सरकारी वकील श्री. ढेकणे यांच्यामार्फत–

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११/०६/२०२२ रोजी वाठोरे पोलिसांनी मला व दुसरा पंच बाजीराव जाधव यांना मौजे हिप्परगा रवा येथे पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी गेलो असता तेथुन पोलिसांना व आम्हाला पाहुन एक इसम पळुन गेला. हे म्हणणे खरे नाही की,पोलीसांनी चौकशी केली असता आजुबाजुचे लोकांनी सदर इसमाचे नाव सोमनाथ नरसिंग मोरे असे असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी असलेल्या दुकानाची झडती घेतली असता एका लाल रंगाच्या पिशवीमध्ये देशी दारु संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. क्षमतेच्या १५ सीलबंद बाटल्या मिळुन आल्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यापैकी एक बॉटल सी.ए.कामी काढून घेतली व त्यावर आमच्या सहयाचे लेबल लावले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलीसांनी आमच्या समक्ष पंचनामा तयार केला तो मला वाचून दाखविला तयार केला, सदर पंचनामा वाचुन दाखविल्यानंतर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.ए ए कुलकर्णी यांच्यामार्फत –**

३. नाकारला.

**फेरतपास नाही.**

**माझे समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत**
**सही/–**
**( एस. एस. कळसकर )**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग लोहारा.**

दिनांक –०२–०२–२०२४.